अध्यक्ष जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
जळगांव

वाचाः १) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
२) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८८७
३) सार्वजनीक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचनाः कोरोना २०२०/ प्रक्र ५८/ आरोग्य/५ दि१४ /०३/२०२०
४) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्र दंडप्र-०१/कावि/२०२०/१९२ दि ०८/०५/२०२०
५) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्र दंडप्र-०१/कावि/२०२०/१९५ दि ०९/०५/२०२०
६) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्र दंडप्र-०१/कावि/२०२०/२०९ दि १३/०५/२०२०
७) मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडील आदेश क्र दंडप्र-०१/कावि/२०२०/१९७ दि ०९/०५/२०२०
८) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०२०/नप्रक्र १२४/आरोग्य ३ अ सार्वजनीक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई दि १३/०५/२०२०

आदेश

क्र/साप्रवी/आरआर/ ७१/२०२०
सामान्य प्रशासन विभाग,जि.प.जळगांव
दिनांक/15/०५/२०२०

ज्याअर्थी, संदर्भ क्र ३ मध्ये नमुद सार्वजनीक आरोग्य विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील अधिसुचना कोरोना २०२०/ प्रक्र ५८/ आरोग्य/५ दि१४ /०३/२०२० अन्वये कोरोना विषाणु (कोव्हीड २९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा हा दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २,३,४ मधील तरतुदीच्या अमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असुन मा.जिल्हाधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी मा.जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव यांनी आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयासाठी आरोग्य सुविधांचे वर्गीकरण त्रिस्तरीय रचना करण्यासाठी, आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता संदर्भ क्र ६ अन्वये माझी नियुक्ती शहर महानगरपालीका वगळुन, उर्वरीत जळगांव जिल्हा(नगरपालीका /नगरपंचायत कार्यक्षेत्रासह) कार्यक्षत्रातील आरोग्य सुविधांचे त्रिस्तरीय वर्गीकरण करणे व सर्व संबधीत यंत्रणा, घटक यांचेशी समन्वय साधुन आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता Incident Commander म्हणुन घोषीत केलेले आहे.

आणि ज्याअर्थी जळगांव जिल्हयातील रुग्णांची वाढती संख्या पहाता जळगांव जिल्हयातील Covid Care Centre/ Dedicated Health Centre(CCC), Dedicated Covid Hospital(DCH) मधील सोयी सुविधांच्या अनुषंगाने नियंत्रण व समन्वय ठेवण्याकरीता तसेच रुग्णांना यथोचित आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता सक्षम अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे माझे मत झालेले आहे.

तसेच संदर्भ क्र ६ मधील मुददा क्र ३ अन्वये प्रत्येक Containment Zone साठी एका अधिका-याची स्वतंत्र नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्याबाबत निर्देशीत केलेनुसार व मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी खालील प्रमाणे आदेशीत करीत आहे.

नगरपालीका /नगरपरिषद कार्यक्षेत्रातील Containment Zone साठी संबधीत मुख्याधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. आपल्या कार्यक्षेत्रात एका पेक्षा जास्त Containment Zone असल्यास आपले स्तरावरुन आपले अधिनस्थ असणा-या विभाग प्रमुखांना सहाय्यक नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात यावी.

ग्रामीण भाग कार्यक्षेत्रातील Containment Zone साठी संबधीत गटविकास अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. ग्रामीण भागामध्ये Containment Zone एका तालुक्यामध्ये एका पेक्षा जास्त झाल्यास संबधीत गटविकास अधिकारी यांनी आपले स्तरावरुन आपले अधिनस्थ सहाय्यक गटविकास

Scanned by CamScanner

अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, पशुधन अधिकारी, कृषी अधिकारी,शाखा अभियंता, उपअभियंता इ. यांची सहाय्यक नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात यावी.

| अक्र | विवरण | जबाबदा-या |
|---|---|---|
| | Containment Zone शहरी भाग | |
| १ | नगरपालीका /नगरपरिषद कार्यक्षेत्रातील Containment Zone साठी मुख्याधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येते आहे. | १) Containment Zone साठी प्रत्येक झोन साठी स्वतंत्र असा शाखा अभियंता /समकक्ष अधिकारी यांची झोन मध्ये Transports& Logistics साठी नेमावा.<br>२) संबधीत शाखा अभियंता यांनी आपल्या झोन मधील पाणी पुरवठा विजपुरवठा, स्वच्छता, साफसफाई, अत्यावश्यक सेवा उपलब्ध व सुस्थितीत राहतील याची दक्षता घेणे.<br>३) संबधीत Zone मध्ये संशयीत कोरोना मृत्यु, नैसर्गिक मृत्यु झाल्यास नोडल अधिकारी यांनी संबधीत स्थानिक पोलीस स्टेशनशी समन्वय करुन मृतदेहाची विल्हेवाट संदर्भ क्र ४ मधे दिलेल्या निर्देशानुसार करण्यात यावी.<br>४) Containment Zone मधील प्रवेश व निर्गमनावर (Entry & Exist) संबधीत पोलीस स्टेशनशी संपर्क साधुन कोणत्याही प्रकारे बाहेरुन आत, वा आतुन बाहेर वा आतल्या आत हालचाली (Movement) होणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>अत्यावश्यक सेवा बाबत संदर्भ क्र ७ मधील नोडल अधिकारी यांनी निर्देशानुसार अमलबजावणी करावी. |
| २ | नगरपालीका /नगरपरिषद कार्यक्षेत्रासाठी Containment Zone निश्चिती | १) Zoneनिश्चीत करतांना नोडल अधिकारी यांनी संबधीत पॉझीटीव्ह रुग्णांचे कॉन्ट्रक्ट ट्रेसींग (सहवासीत) शोधुन लघुत्तम कोअर एरिया निश्चीत करावा. व त्यानंतर त्याबाहेर लघुत्तम असा बफर झोन ही निश्चीत करावा.<br>तसेच तेथील कुटुंबसंख्या, लोकसंख्या, घरसंख्या इ यांची निश्चीती बिनाविलंब करावी.<br>जेवढा लघुत्तम कोअर एरिया असेल तेवढे उपाययोजना प्रभावीपणे राबविणे शक्य होईल.<br>त्यामुळे झोन निश्चीती करतांना लघुत्तम कोअर एरिया निश्चीत करणेवर विशेष भर दयावा. |
| ४ | नगरपालीका /नगरपरिषद कार्यक्षेत्रासाठी Containment Zone मधील सर्व्हेक्षण | १) मुख्याधिकारी यांनी आपले अधिनस्थ आरोग्य विभागा अंतर्गत कर्मचारी यांची सर्व्हेसाठी नियुक्ती करावी.<br>२) सर्व्हेसाठी लोकसंख्या, घरसंख्या,कुटुंब संख्या उपलब्ध करुन दयावी.<br>३) लोकसंख्येप्रमाणे टिम निश्चीत कराव्यात व एका टिम मध्ये किमान २ सदस्यांचा समावेश असावा, दररोज एका टिमला किमान १०० घरे सर्व्हेक्षणासाठी देण्यात यावीत व सदर सर्व्हेक्षण एका दिवसात पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.<br>४) सर्व्हेक्षण टिमचे तपासणीनंतर जर संशयीत रुग्ण, आजारी व्यक्ती, अतिजोखीमीच्या व्यक्ती आढळुन आल्यास त्यांची माहिती नोडल अधिकारी यांनी एकत्रीत करावी. |
| ५ | शहरीभागातील Containment Zone साठी तालुका आरोग्य अधिकारी यांनी CHO ची नियुक्ती करावी | Community Health Officer (CHO) यांच्या जबाबदा-या<br>१) टिम ने भेट दिलेल्या घरापैकी १० टक्के घरांना भेटी देणे.<br>२) सर्व्हे टिम कडील आजारी व्यक्तिची तपासणी करणे त्यांना औषधोपचार करणे.<br>३) सदर व्यक्तीस आवश्यकता असल्यास Covid Care Centre/ Dedicated Health Centre मध्ये संदर्भित करावे.<br>४) Zone मधील हायरिस्क सहवासीत जसे की घरातील व्यक्ति गंभीर आजारी व्यक्ति,मधुमेह,उच्चरक्त दाब असलेल्या व्यक्तिची नांवे फोन नंबर,वय सह तयार करणे याबाबत Containment Zone साठी नियुक्त नोडल अधिकारी यांना सदर यादी सुपुर्द करण्यात यावी. CHO यांनी सदर व्यक्तीची नियमीतपणे तपासणी करावी.<br>५) Containment Zone मधील आवश्यक असणारे व वेळोवेळी लागणारे माहीतीचे फॉर्म भरुन तालुका आरोग्य अधिकारी व नोडल अधिकारी यांना दररोज देण्यात यावेत. |

Scanned by CamScanner

| | Containment Zone ग्रामीण भाग | |
|---|---|---|
| १ | Containment Zone ग्रामीण भाग कार्यक्षेत्रासाठी गटविकास अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. | Containment Zone साठी<br>१) Zone मधील सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पोलीस पाटील यांची संयुक्त अशी कोअर कमीटी स्थापन करावी.<br>२) शाखा अभियंता /समकक्ष अधिकारी यांची Containment Zone मध्ये Transports& Logistics साठी नेमणुक करावी.<br>३) शाखा अभियंता यांनी Zone मध्ये आवश्यक पाणी पुरवठा, विजपुरवठा, स्वच्छता, साफसफाई, अत्यावश्यक सेवा उपलब्ध व सुस्थितीत राहतील याची दक्षता घ्यावी.<br>४)ग्रामीण भागातील Containment Zone मध्ये संशयीत कोरोना मृत्यु, नैसगिक मृत्यु झाल्यास Containment Zone च्या सरपंच, ग्रामसेवक,तलाठी,पोलीसपाटील यांनी संबधीत स्थानिक पोलीस स्टेशन शी समन्वय करुन मृतदेहाची विल्हेवाट संदर्भ क्र ८ मधील दिलेल्या निर्देशानुसार करण्यात यावीत.<br>5) Zone मधील प्रवेश व निर्गमनावर (Entry & Exist) संबधीत पोलीस स्टेशनशी संपर्क साधुन कोणत्याही प्रकारे बाहेरुन आत, वा आतुन बाहेर वा आतल्या आत हालचाली (Movement) होणार नाही याची दक्षता घ्यावी.<br>अत्यावश्यक सेवा बाबत संदर्भ क्र ७ मधील नोडल अधिकारी यांचे निर्देशानुसार अमलबजावणी करावी.<br>6) Zoneनिश्चीत करतांना नोडल अधिकारी यांनी संबधीत पॉझीटीव्ह रुग्णांचे कॉन्ट्रक्ट ट्रेसीग (सहवासीत) शोधुन लघुत्तम कोअर एरिया निश्चीत करावा. व त्यानंतर त्याबाहेर लघुत्तम असा बफर झोन ही निश्चीत करावा. |
| २ | ग्रामीण भागातील कार्यक्षेत्रासाठी Containment Zone निश्चिती | १) Zoneनिश्चीत करतांना नोडल अधिकारी यांनी संबधीत पॉझीटीव्ह रुग्णांचे कॉन्ट्रक्ट ट्रेसीग (सहवासीत) शोधुन लघुत्तम कोअर एरिया निश्चीत करावा. व त्यानंतर त्याबाहेर लघुत्तम असा बफर झोन ही निश्चीत करावा.<br>तसेच तेथील कुटुंबसंख्या, लोकसंख्या, घरसंख्या इ यांची निश्चीती बिनाविलंब करावी.<br>जेवढा लघुत्तम कोअर एरिया असेल तेवढे उपाययोजना प्रभावीपणे राबविणे शक्य होईल.<br>त्यामुळे झोन निश्चीती करतांना लघुत्तम कोअर एरिया निश्वीत करणेवर विशेष भर दयावा. |
| ३ | ग्रामीण भागातील Containment Zone मधील सर्व्हेक्षण | १)संबधीत प्रा. आ केंद्राचे वैदयकीय अधिकारी यांनी आपले अधिनस्थ आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा, अंगणवाडी सेविका इ कर्मचारी यांची सर्व्हेसाठी नियुक्ती करावी. तसेच प्रा आ केंद्राचे आरोग्य सहाय्यक व आरोग्य सहाय्यीका यांना पर्यवेक्षणाची जबाबदारी देण्यात यावी.<br>२) सर्व्हेसाठी लोकसंख्या, घरसंख्या,कुटुंब संख्या उपलब्ध करुन दयावी.<br>३) लोकसंख्येप्रमाणे टिम निश्चीत कराव्यात व एका टिम मध्ये किमान २ सदस्यांचा समावेश असावा, दररोज एका टिमला किमान १०० घरे सर्व्हेक्षणासाठी देण्यात यावीत. सदरचे सर्व्हेक्षण हे एका दिवसात पुर्ण करावे.<br>४) सर्व्हेक्षण टिमचे तपासणीनंतर जर संशयीत रुग्ण, आजारी व्यक्ती, अतिजोखीमीच्या व्यक्ती आढळुन आल्यास त्यांची माहिती नोडल अधिकारी यांनी एकत्रीत करावी. |
| ४ | ग्रामीण भागातील Containment Zone साठी तालुका आरोग्य अधिकारी यांनी CHO ची नियुक्ती करावी | Community Health Officer (CHO) यांच्या जबाबदा-या<br>१) टिम ने भेट दिलेल्या घरापैकी १० टक्के घरांना भेटी देणे.<br>२) सर्व्हे टिम कडील आजारी व्यक्तिची तपासणी करणे त्यांना औषधोपचार करणे.<br>३) सदर व्यक्तीस आवश्यकता असल्यास Covid Care Centre/ Dedicated Health Centre मध्ये संदर्भित करावे.<br>४) Zone मधील हायरिस्क सहवासीत जसे की घरातील व्यक्ति गंभीर आजारी व्यक्ति,मधुमेह,उच्चरक्त दाब असलेल्या व्यक्तिची नांवे फोन नंबर,वय सह तयार करणे याबाबत Containment Zone साठी नियुक्त नोडल अधिकारी यांना सदर यादी सुपुर्द करण्यात यावी. CHO यांनी हायरिस्क व्यक्तीची नियमीतपणे तपासणी करावी.<br>५) Containment Zone मधील आवश्यक असणारे व वेळोवेळी लागणारे माहीतीचे फॉर्म भरुन तालुका आरोग्य अधिकारी व नोडल अधिकारी यांना दररोज देण्यात यावेत. |

Scanned by CamScanner

## आदेश

1) Containment Zone मध्ये स्वच्छता गृह, प्रसाधनगृह,पाणीपुरवठा,विजपुरवठा वगैरेची सुरळीत पुरवठा करण्याची जबाबदारी संबधीत स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील.

2) वापरलेले मास्क दररोज संकलीत करुन त्यांची शासनाच्या निर्देशानुसार शास्त्रोसक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबधीत स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील.

3) Containment Zone मधील सर्व प्रकारचे सार्वजनीक आरोग्य विभागासाठी आवश्यक अहवाल CHO यांनी दररोज तालुका आरोग्य अधिकारी यांना ३.३० पर्यत सादर करावा.

4) Containment Zone मधील सर्व्हे टिमची वैदयकीय तपासणी नगरपालीका स्तरावरील वैदयकीय अधिक्षक यांनी करावी, ग्रामीण भागातील टिमची वैदयकीय तपासणी वैदयकीय अधिकारी, प्रा.आ केंद्र यांनी करावी.

5) Containment Zone मधील सर्व्हेसाठी आवश्यक साधनसामुग्री ही संबधीत स्थानिक स्वराज्य संस्थेने उपलब्ध करुन दयावी.

यासोबत भारत सरकार महाराष्ट्र शासना,जिल्हा प्रशासना मार्फत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या सर्व निर्णय सर्व स्तरावर लागु असतील.

Taluka Incident Commader यांनी त्रिस्तरीय रचनेकरीता आवश्यक ते मनुष्यबळ, खाजगी रुग्णालय, साधन सामुग्री व उपकरणे, रुग्णवाहीका, खाजगी वाहने, शववाहीका आवश्यकतेनुसार अधिग्रहीत करावेत.

उपरोक्त नमुद अधिकारी यांनी सदर आदेशाचे तात्काळ अमलबजावणी करुन कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने जबाबदारीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी

(गोरक्ष गाडीलकर)
अध्यक्ष जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
जळगांव तथा Incident Commader

प्रतः माहीतीस्तव सविनय सादर
१) म.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग नाशिक
२) मा.जिल्हाधिकारी,जळगांव
३) मा.पोलीस अधिक्षक, जळगांव
४) म.अधिक्षक अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग जळगांव

प्रतः माहीतीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
1) डॉ .एन.एस चव्हाण, जिल्हा शल्यचिकीत्सक, सामान्य रुगणालय जळगांव
2) उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व) जि जळगांव
3) तहसिलदार, (सर्व) जि जळगांव
4) गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
5) मुख्याधिकारी, नगरपालीका/ नगरपरिषद (सर्व) जि जळगांव
6) वैदयकीय अधिक्षक,(सर्व) ग्रामीण रुग्णालय /उपजिल्हारुग्णालय
7) शाखा अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग

Scanned by CamScanner